# आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

दुरध्वनी – ०२२ – २२७१७५००
फॅक्स – ०२२ – २२६४२२५१५
E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com

आरोग्य भवन, ३रा मजला,
सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, पी. डिमेलो रोड,
सीएसटी जवळ, फोर्ट, मुंबई ४००००१


क्र.राआसो/आस्था/सेवा ज्येष्ठता याद्या/ ९०५७९-९११०४ /२०२५
दिनांक - २९/१०/२०२५

प्रति

**उपसंचालक,**
**आरोग्य सेवा परिमंडळे (सर्व)**

**विषय- राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचारी यांच्या समकक्ष संवर्गाची सेवा ज्येष्ठता यादी प्रसिध्द करणेबाबत.**

संदर्भ- १) मा.उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक एनएचएम-११२५/प्र.क्र.३९१/ एनएचएम, दिनांक ०१/०८/२०२५

२) मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे अध्यक्षतेखाली दि.१५/०७/२०२५ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त शासन पत्र क्र.बैठक २८२५/प्र.क्र.३६९/एनएचएम, दिनांक १४/०८/२०२५

३) या कार्यालयाचे निर्गमित पत्र क्र.राआसो/मनुष्यबळ कक्ष/समायोजन ज्येष्ठता यादी /५८४७०-५९०१९/२०२५, दिनांक २०/०८/२०२५

४) या कार्यालयाचे जा.क्र.राआअ/आस्था/समायोजन ज्येष्ठता यादी/८१३२३-४८८ /२०२५, दिनांक ०७/१०/२०२५.

५) मा.आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांची दिनांक २७/१०/२०२५ रोजीची मान्य टिपणी.

उपरोक्त विषयी संदर्भिय क्र.१ च्या पत्रान्वये दि.१४ मार्च २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचा-यांच्या सेवा समावेशन प्रक्रियेकरिता समकक्ष असलेल्या एकुण ३१ संवर्गापैकी १५ संवर्गाची सेवा ज्येष्ठता याद्या शासन स्तरावर प्रसिध्द झालेल्या आहेत. उर्वरीत १६ समकक्ष संवर्गाच्या सेवा ज्येष्ठता याद्या प्रसिध्द करणे आवश्यक असून त्याबाबत आवश्यक कार्यवाही करणेबाबत शासनामार्फत कळविले होते.

सदर शासन पत्रात नमुद केलेनुसार संदर्भ क्र.२ व ३ च्या पत्रान्वये उर्वरीत १६ समकक्ष संवर्गाच्या सेवा ज्येष्ठता याद्यांची माहिती हार्डकॉपी व सॉफ्टकॉपीसह मुख्य प्रशासकीय अधिकारी, परिमंडळ आणि परिमंडळ कार्यक्रम व्यवस्थापक यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहुन आरोग्य भवन आयुक्तालय, मुंबई येथे माहिती सादर करणेबाबत कळविले होते.

त्यानुसार संदर्भ क्र.५ अन्वये प्राप्त झालेल्या उर्वरीत १६ समकक्ष संवर्गाच्या अंतरिम सेवा ज्येष्ठता याद्या राज्यस्तरावरुन एकत्रित करुन राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या https://nhm.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. तरी सेवा ज्येष्ठता याद्या नियुक्ती प्राधिकारी यांनी नोटीस बोर्डावर दर्शनी भागात जाहीर प्रसिध्दी करुन सर्व संबंधित जिल्हास्तर, परिमंडळस्तर व राज्यस्तरावर सुचना निर्गमित करण्यात याव्यात. सदरच्या अंतरिम सेवा ज्येष्ठता याद्या सर्व संबंधित कंत्राटी कर्मचारी यांचे लेखी निदर्शनास आणून देण्यात यावी.

तरी अभियानांतर्गत कार्यरत सर्व कंत्राटी अधिकारी व कर्मचारी ज्यांची नियुक्ती/पुनर्नियुक्ती जिल्हास्तरावरुन करण्यात येते असे कंत्राटी अधिकारी व कर्मचारी व राज्यस्तरावरुन नेमणूक केलेल्या कंत्राटी कर्मचा-यांची सेवा ज्येष्ठता याद्या राज्यस्तरावरुन प्रसिध्द करण्यात येत असल्याने सदर संवर्गनिहाय याद्यास जिल्हास्तरावर देखील जाहीर प्रसिध्दी देण्यात यावी.

सदर प्रसिध्द करण्यात आलेल्या सेवा ज्येष्ठता याद्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कालमर्यादा निश्चित करण्यात येत आहे.

| अ.क्र | तपशिल | कालमर्यादा |
|---|---|---|
| १. | राज्य कार्यालयाकडुन प्रसिध्द झालेल्या १६ संवर्गाच्या सेवा ज्येष्ठता याद्या कार्यालयाच्या दर्शनी भागात लावणे. | प्रसिध्दी नंतर त्वरीत |
| २. | जाहिर प्रसिध्द याद्या हरकती जिल्हास्तरावरुन हरकती मागविणे व निपटारा करणे. कार्यालयीन कामकाजाचे १५ दिवस. | दिनांक ०३/११/२०२५ ते दिनांक २४/११/२०२५ |
| ३. | विभाग स्तरावर हरकतीसह सेवा ज्येष्ठता याद्या एकत्रीकरण करणे. कार्यालयीन कामकाजाचे १० दिवस | दिनांक २५/११/२०२५ ते दिनांक ०८/१२/२०२५ |
| ४. | १) एकत्रीकरण केलेल्या सेवा ज्येष्ठता याद्या उपसंचालक, आरोग्य सेवा, परिमंडळ यांचे शिफारशीसह माहिती हार्डकॉपी व सॉप्टकॉपीसह राज्य कार्यालयास सादर करणे.<br>२) पुणे/मुंबई कार्यालयाने आपले वरीष्ठ अधिका-यांची मान्यता घेऊन कार्यवाही करावी. | दिनांक ०९/१२/२०२५ |

**टिप:-** १) सेवा ज्येष्ठता यादीतील कर्मचा-यांनी आक्षेप संबधीत जिल्हयांमार्फत उपसंचालक आरोग्य सेवा परिमंडळ कार्यालयाकडे पाठविण्यात यावेत. परस्पर राज्य कार्यालयाकडे सादर केलेले आक्षेप ग्राहय धरण्यात येणार नाहीत.

**(राजेंद्र भालेराव)**
**सहसंचालक (अतांत्रिक),**
**राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.**

**प्रत कार्यवाहीस्तव-**

१) मा.आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
२) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
३) मा.संचालक राज्य आरोग्य व प्रशिक्षण संस्था नागपूर.
४) उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळे (सर्व)
५) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
६) जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय (सर्व)
७) प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र (सर्व)
८) वैद्यकीय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका (सर्व)
९) वैद्यकीय अधिक्षक, कामा रुग्णालय, मुंबई.
१०) परिमंडळ कार्यक्रम व्यवस्थापक, परिमंडळे (सर्व)
११) जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, जिल्हा परिषद (सर्व)
१२) जिल्हा लेखा व्यवस्थापक, जिल्हा परिषद (सर्व)
१३) शहर कार्यक्रम व्यवस्थापक, महानगरपालिका (सर्व)
१४) शहर लेखा व्यवस्थापक, महानगरपालिका (सर्व)

**प्रत माहितीस्तव-**

१) मा.सचिव १ व २, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) मा.आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
४) मा.संचालक, आरोग्य सेवा १ व २ (मुंबई/पुणे)
५) मा.संचालक, आरोग्य सेवा (शहरी), मुंबई.
६) मा.खाजगी सचिव, मा.मंत्री महोदय (आरोग्य) यांचे कार्यालय, मुंबई.
७) सहसंचालक तात्रिक राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
८) सहसंचालक अतांत्रिक राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
९) कार्यक्रम प्रमुख, सर्व (मुंबई/पुणे)